MHLA140017182025

दाखल दिनांक : १७/०६/२०२५
नोंदणी दिनांक : १७/०६/२०२५
निकाल दिनांक : १३/०३/२०२६
कालावधी : ००व ०८म २४दि

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा, ता. औसा यांच्या न्यायालयात,**
**{ पिठासीन अधिकारी श्री. आवटे पी. पी. }**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९१२/२०२५** **निशाणी क्र.२२.**

**स्वामी समर्थ मल्टिस्टेट को—ऑप क्रेडीट सोसायटी,**
लि. मुख्य कार्यालय उजनी, शाखा औसा, ता. औसा
शाखाधिकारी शिवप्रतापसिंह पिता रमेशसिंह चौहाण
वय ३४ वर्षे, औसा, ता. औसा, जि. लातूर. **...फिर्यादी**

**विरुध्द**

**बालाजी पिता शिवाजी भोजराज,**
वय — २८ वर्षे, व्यवसाय — बालाजी भेळ सेंटर,
रा. एस.बी.आय. बॅकेजवळ, औसा, ता. औसा, जि. लातूर. **... आरोपी**

**परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये.**

........................................................................................................

फिर्यादीतर्फे वकील — श्री. एम.बी. वागदरे,

आरोपीतर्फे वकील — श्री. एस. एच. माडजे.

........................................................................................................

## : न्या य नि र्ण य :

**( दिनांक १३ मार्च, २०२६ )**

**१.** परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अन्वये सदर खटला दाखल करण्यात आलेला आहे.

२. **फिर्यादीपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे**:—

प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी ही कर्ज व पतपुरवठादार वित्तीय संस्था असून ती व्यवसायाकरीता तसेच कर्ज देणारी संस्था असून तिचे कार्यालय औसा, ता. औसा, जि. लातूर येथे आहे. आरोपी हा वैयक्तीक कर्जासाठी फिर्यादीकडे आला असता त्याने फिर्यादीस कर्ज मागणीचा अर्ज केला. त्यानंतर सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यास आरोपीस द.सा.द.शे. १८ टक्के व्याजदराने एकुण ९०,०००/— चे कर्ज मंजुर केले. त्यानुसार फिर्यादीने आरोपीस कर्ज सोसायटीच्या नियम व अटीस आधीन राहून दिले. आरोपीने फिर्यादीच्या हक्कात वैयक्तिक कर्जरोखा, कर्ज परत फेडीचा करारनामा व रक्कम रुपये ९०,०००/— ची वचन चिठ्ठी करुन इतर सर्व कागदपत्रांची पुर्तता केली. त्यानुसार फिर्यादीने आरोपीस रक्कम रुपये ९०,०००/— कर्ज दिले.

**३.** फिर्यादी व आरोपीमध्ये झालेल्या कराराप्रमाणे आरोपीने फिर्यादी सोसायटीच्या कर्जाच्या रकमेची परतफेड केली नाही. म्हणून दिनांक १८/०२/२०२५ रोजी फिर्यादीने आरोपीस भेटून कर्जाच्या रकमेची व कर्ज खात्याची माहिती दिली व कर्ज रक्कम भरण्याची विनंती केली. त्यावेळी आरोपीने कर्ज रक्कम भरतो असे सांगितले, परंतु रक्कम भरली नाही. दिनांक ११/०३/२०२५ रोजी फिर्यादी सोसायटी व कर्मचारी यांनी आरोपीच्या व्यवसायाच्या ठिकाणी भेट दिली व येणे असलेली रक्कम रुपये ९६,४६८/— रकमेची मागणी केली, त्यावेळी आरोपीने कर्ज रक्कम देण्याचे मान्य केली. तेव्हा आरोपीने त्याच्या कायदेशीर देणेपोटी चेक नं. २०९१७१ दिनांक १२/०३/२०२५ रोजीचा रक्कम रुपये ९६,४६८/— चा आय.डी.बी.आय.बॅक, शाखा मेन रोड, औसा, ता. औसा, याचा चेक फिर्यादीस दिला. प्रस्तुतचा चेक नं. २०९१७१ हा फिर्यादीने आय.सी.आय.सी.आय., शाखा औसा बॅकेत सादर केला असता सदरचा चेक Funds Insufficient, या कारणाने न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस कायदेशीर नोटीस दि.१३/०५/२०२५ रोजी रजि.पोस्टाने पाठविली व ती आरोपीस १४/०५/२०२५ रोजी मिळाली होती. परंतु, आरोपीने सदर नोटीसचे उत्तर अथवा रकमेची परतफेड केली नाही. त्यानंतर देखील आरोपीने पैसे देणेस नकार दिला. त्यामुळे फिर्यादीने प्रस्तुत फिर्याद दि. १७/०६/२०२५ रोजी न्यायालयात दाखल केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरण हे संक्षिप्त फौजदारी संपरिक्षेप्रमाणे चालविण्यात आले. आरोपीस समन्स काढण्यात आले. आरोपी याकामी हजर झाला व आरोपीविरूध्द दोषारोपाचा तपशील निशाणी १८ वर नोंदवला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगीतले. त्यामुळे आरोपीविरूध्द प्रस्तुतची केस चालविण्यात आली.

५. फिर्यादीने त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र म्हणुन निशाणी क्र. २० वर पुरसीस दाखल केली. फिर्यादी व आरोपीमध्ये यांनी त्यांचे मध्ये तडजोड झाल्याचे सांगुन निशाणी २० वर त्यांचेमधील तडजोड पुरसीस दाखल केली. फिर्यादी व आरोपींमध्ये तडजोड झाल्यामुळे तसेच आरोपींविरूध्द दोषारोपदर्शक कोणतीही परिस्थिती आलेली नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी ०१ वरील आदेशानुसार सहवितरीत करण्यात आले.

६. फिर्यादीचा पुरावा व आरोपींचा बचाव विचारात घेवून खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत, त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १) | फिर्यादीने शाबीत केले काय की, आरोपीने वादातील चेक फिर्यादीच्या हक्कात त्याच्या खात्यावरून दिला होता व ते खाते आरोपीचे आहे? | होय |
| २) | फिर्यादीने कलम १३८ अन्वये आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता केली आहे काय? | नाही |
| ३) | फिर्यादीने शाबीत केले काय की, आरोपीने कायदेशीर देणे देण्याकरीता त्याला वादातील धनादेश दिला होता? | नाही |
| ४) | फिर्यादीने शाबीत केले काय की आरोपीने परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ नुसार कलम १३८ अन्वये गुन्हा केला? | नाही |
| ५) | काय आदेश व हुकूमनामा? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

७. फिर्यादीने सदरचे प्रकरणी फिर्यादीसोबत कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच निशाणी ४/१ वर वादातील चेकची झेरॉक्स, निशाणी ४/२ वर बॅक मेमो, निशाणी ४/३ वर आरोपीस पाठविलेली नोटीस, निशाणी ४/४ नोटीस मिळाल्याची

पोच पावती, ४/५ आर.पी.ए.डी.चा पोस्टाचा रिपोर्ट, ४/६ आर.पी.ए.डी.चा स्टेअस रिपोर्ट, ४/७ आर.पी.ए.डी.चा रिटर्न अॅक्नॉलेजमेंट, निशाणी ४/८ वर पतसंस्थेचे ठरावाची प्रत ही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले आहेत. फिर्यादीच्या वकीलांचा व आरोपीचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करीता</u>** :—

८. मुद्दा क्रमांक १ ते ४ ची कारणमिमांसा एकत्रितपणे करण्यात येते आहे. फिर्यादीने त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. फिर्यादीने कथन केले आहे की, आरोपी हा वैयक्तिक कर्जासाठी फिर्यादीकडे आला असता फिर्यादीकडून रक्कम रुपये ९०,०००/— ची मागणी केली. त्यानुसार रक्कम रुपये ९०,०००/— पोटी आरोपीसोबत कर्जासाठी करार करण्यात आला. सबब, आरोपीने त्याच्या कायदेशीर देणेपोटी चेक नं. २०९१७१ दिनांक ११/०३/२०२५ रोजीचा रक्कम रुपये ९६,४६८/— चा आय.डी.बी.आय. बॅक, शाखा मेन रोड, औसा, ता. औसा, याचा चेक फिर्यादीस दिला. प्रस्तुतचा चेक नं. २०९१७१ हा फिर्यादीने आय.सी. आय.सी.आय. बॅकेत सादर केला असता सदरचा चेक पुरेशी रक्कम शिल्लक नाही, या कारणाने न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस कायदेशीर नोटीस दि. १३/०५/२०२५ रोजी रजि.पोस्टाने पाठविली व ती आरोपीस १४/०५/२०२५ रोजी मिळाली होती. परंतु, आरोपीने सदर रकमेची परतफेड केली नाही.

९. प्रस्तुत प्रकरणी फिर्यादीने, निशाणी ४/१ वर वादातील चेकची झेरॉक्स, निशाणी ४/२ वर बॅक मेमो, निशाणी ४/३ वर आरोपीस पाठविलेली नोटीस, निशाणी ४/४ नोटीस मिळाल्याची पोच पावती, ४/५ आर.पी.ए.डी.चा पोस्टाचा रिपोर्ट, ४/६ आर.पी.ए.डी.चा स्टेअस रिपोर्ट, ४/७ आर.पी.ए.डी.चा रिटर्न अॅक्नॉलेजमेंट, निशाणी ४/८ वर पतसंस्थेचे ठरावाची प्रत ही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले आहेत. त्यायोगे, वरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रस्तुत प्रकरणात निशाणी २० वर आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादीने हा सदरचे वादातील चेक जरी दिला असला तरी प्रस्तुत चेक अनादरीत झाल्याची बाब फिर्यादीने संशयापलिकडे शाबीत केली नसल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणात जरी फिर्यादी खात्याचे तपशील दाखल केले असली तरी सदरचे चेक

अनादरित झाल्याची बाब देखील संशयापलिकडे शाबीत होत नसल्याचे दिसून येते. तसेच आरोपी व फिर्यादीमध्ये निशाणी २० नुसार तडजोड झाल्यामुळे आरोपींविरूध्द असलेले दोषारोपाचे तपशील ठळकपणे फिर्यादीने शाबीत केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे मुद्दा क्रं. १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रं. २ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**मुद्दा क्र.५ करीता** :—

**१०.** फिर्यादीने दिलेल्या अभिलेखावरील सर्व कागदापत्रावरून तसेच तपशीलावरून आरोपींविरूध्दचा दोषारोप शाबीत होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपीची परक्राम्य संलेख अधिनियमच्या कलम १३८ प्रमाणे, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अधिनियमाच्या कलम २७८ नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अधिनियमाच्या कलम ४८१ नुसार पुर्वीचा जामीन अपिल कालावधीपर्यंत कायम करण्यात यावेत. |

***(खुल्या न्यायालयात अधिघोषित)***

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.03.13 17:11:49 +0530

औसा ( श्री. आवटे पी. पी. )
दिनांक: १३/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा.